१८३१

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५५०

REFBK-0004489
REFBK-0004489

म. ग्रं. सं. ठाणे
काव्य
५४०

# चिलया बाळ

(पद्यात्मक चरित)

कवि:- डॉ. काशिनाथ रामकृष्ण
धर्माधिकारी.

१९३१.

स्थळ प्रत
सं. काव्य नं. ३०७८

REFBK-0004489
REFBK-0004489

६०९६
स्थळ प्रत ९०८८
कां०५ नं.
४०८१

# प्रास्ताविक.

काव्यरत्नावलीचे कवि व हितचिंतक, दर्यापूर वऱ्हाड येथील प्रसिद्ध डॉक्टर रा. रा. काशिनाथ रामकृष्ण धर्माधिकारी, यांनीं काव्यरत्नावलींतून क्रमशः प्रसिद्ध केलेल्या चिलियाबाळ या लहानशा खंडकाव्याला स्वतंत्र प्रती छापतांना प्रस्तावना लिहिण्याची आज्ञा केली. माझ्यासारख्या काव्यप्रांतांत अनभिज्ञ असलेल्यानें डॉक्टर साहेबांच्या उत्कृष्ट काव्याला प्रस्तावना ती काय लिहावयाची ? पण त्यांच्या आज्ञेप्रमाणें दोन शब्द लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे.

चिलिया बाळाची कथा शिवलीलामृतात असून त्या कथेच्या आधारानें हें काव्य आर्यावृतांत लिहिलें आहे. सदरहू कथा अत्यंत भक्तिरसात्मक असून फारच कारुणिक आहे. प्रसिद्ध कवी श्रीधर यांनीं हें ओवीवृत्तांत लिहिलें असून नवनीत वाचणाऱ्यांच्या वाचनांतून हे बहुधा सुटले नसेलच. हें काव्य काव्यरत्नावली मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेच आहे; परंतु काव्यरत्नावली न वाचणाऱ्या लोकांनींही त्याचा आस्वाद घ्यावा ह्या हेतूनें त्याच्या स्वतंत्र प्रती काढविल्या आहेत. ह्या आर्यावृत्तांतील काव्याची रचना चांगली झाली असून काव्य वाचतांना कविवर्य मोरोपंताची आठवण होते. यांतील निरनिराळे प्रसंग कवीनें ओजस्वी वाणीनें दाखविले आहेत. श्रियाळ राजाची व चांगुणा राणीची श्री शंकरभक्ति, चिलियाबाळाची सत्वरक्षणाकरितां आत्माहुतीची तयारी, चांगुणेचा शोक, भक्ताची कसोटी पाहण्यासाठीं श्रीशंकरानें दाखविलेलें क्रौर्य व इतर अनेक प्रसंगाचीं वर्णनें कवीची प्रतिभा चांगली दाखवित. शेवटीं आपल्या भक्तांचा उद्धार केल्याचा प्रसंग भक्तिरसानुकूलच आहे. आमच्या वर्णनापेक्षां रसिकांनीं प्रत्यक्षच काव्य वाचून आपलें मत बनवावे एवढें सांगून ही लहानशी प्रस्तावना पुरी करतो.

हें काव्य छापतांना कांहीं नजरचुकीनें व खिळे जोडणाऱ्याच्या चुकीनें बऱ्याच ठिकाणीं अशुद्धें राहिलीं आहेत तीं रसिक वाचक शुद्ध करूनच वाचतील अशी आशा आहे.

**वासुदेव नारायण फडणीस**

मॅनेजर बाबजी प्रिंटींग प्रेस

Dr. K. R. Dharmadhikary
L. M. & S, Daryapur.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

# चिलया बाळ.

वृत्त-आर्या.

भगवान्, भक्तजनप्रिय, भवभंजक, भद्र, भस्मधर, भर्ग
भोगि विभूषण, शंकर भजतों देवो मतीस सन्मार्ग १
श्री अलकावतिपतिपद भावें भज नित्य परम सुखद मना
हेंचि खरें भेषज बा ! दुर्धर संसार विषय विष दमना २
आर्यारूपें झाला अमर जगीं श्रेष्ठ आर्य सत्कवि तो
श्री मन्मयूरचरणीं मी प्रज्ञाहीन शीर्ष वांकवितों ३
सत्वार्थ निज पित्याच्या करुनी तनुयज्ञ तनयवर चिलया
जिंकी मायातीता परमेशा शिशुपणींच सुखनिलया ४
निर्मल यश बाळाचें अमृतोदधि त्यांत लेश मज्जन हो
गातों मी प्रेमानें ऐका देवोनि चित्त सज्जन हो ! ५
एकें समयीं नारद लोकानुग्रह करावया, सगळीं—
भुवनें हिंडत आला कैलासीं धूर्जटीउमाजवळीं १
सत्कारुनी मुनीला शिव बोले त्रिभुवनीं तुझें गमन
मद्भक्त कोण ? कोठें ? उत्सुक ऐकावयास सांग मन २
विनयें भवनिधिपारद नारद कर जोडुनी त्रिपुरकदना
हृदयाल्हादक वचनीं बोले; परिसा सुकीर्तिच्या सदना ३
भक्त तुझे अमित जगीं होउनि गेले; किती जगीं असती
भक्तिसुधारसपानें मोक्षासहि तुच्छ मानुनी हंसती ४
“ परि भूवरि राज्य करी कांती नगरीं श्रियाळ भक्तगणीं—
शोभे सकल कलायुत जो वाटे नक्षत्रनाथ शशि भगणीं ५

धार्मिक, उदार, सात्विक, दाता श्रीशंकरा ! महादेवा ! !
सत्यप्रज्ञ गमे जणुं, अपरचि निःशंक राम हा देवा ! ६
" बहु अन्नसत्र चालवि झालीं वर्षे दहा सहस्र पहा !
अतिथींस नित्य पूजी बघतां नच जाति, वर्ण, गुण, नृप हा ७
" इच्छाभोजनदानीं तोषविले अतिथि विविध रायानें
देवा ! क्षमा गुणानें लाजविली ही वसुंधरा यानें ८
अवनीवरि ही दुर्लभ याचक जरि नित्य वस्तुतें याची
कालाकाल न बघतां पुरवि मनःकामना मुदें याची " ९
ऐकुनि वचन सदाशिव निजभक्तस्तवनपर परम धाला
प्रेमें डोले, जैसा मधुकर सेवोनि मधुरतर मधाला १०
बोले शिव "नाकर्षे ! भक्तांच्या शुद्धतर चारितपानें-
होतों प्रसन्न; तैसा नच मी आराधिलें जरि तपानें ११
परि मी प्रसाद न करीं त्यास कसोटीस लावल्याविण गा !
होतां प्रसन्न देतों निजसर्वस्वहि असेंचि विदित जगा १२
यास्तव सत्व पहाया जातों घेवूनि हीन वेषातें
दुःसह इच्छाभोजन मागुनि बहु छळित मानवेशातें १३
वदुनि असें करुणाकर अतिथीचें उग्र, भयद, अतिमलिन
धरि बाह्यरूप केवळ पावे ज्या पाड भदय मति कालि न १४
दुर्गंधयुक्त कुश्चळ भरलें सर्वांग गलित कुष्ठानें
व्रणभागीं कृमि बहुविध वळवळती व्यास नेत्र चिपडानें १५
यापरि विहीन रूपें रायाच्या विमल सत्व धर्नि घाला-
घालाया परमेश्वर कांती नगरीस सत्वर निघाला १६

येतां पुरींत पुरजन ऐसें तद्रूप भयद पाहून
भ्याले वीरहि वदती कीं शतपट यम बराच याहून १७
घाबरल्या नरनारी येतां नरपतिगृहांत मध्यान्हीं
बोलवुनी अतिथीला बसला जेथें नृपोत्तम ध्यानीं १८
मारी हांक नृपाला क्रोधाचा उपरि आव घालून
" अभ्यागतासि पाहुनि ढोंग्या ! कां नेत्र मिटसि दाटून १९
" परम दयावंत असा जगतीं तूं ख्यात आपणा करिसी
बाह्यामंगळ केवळ मजसम अतिथींस परि अनादरिसी " २०
खरतर वचनशरांनीं विंधुनि अति मृदुल हृदय रायातें
ध्यानांतुनि जागविलें दुःसह छलविषय निज करायातें २१
उठला भयार्त भूपति पाहुनि संतप्त अतिथितें जवळीं
" भगवन् क्षमस्व दीनं " वदुनि असें तत्क्षणीं पदीं कवळी २२
मग षोडशोपचारें पूजन करि अतिथिचें यथासांग
कांतेसह कर जोडुनि विनवी " निज वांछित प्रभो सांग" २३
यापरि विनय नृपाचा पाहुनि बहु शंभु तोषला न मनीं
बोले " क्षुत्पीडित मी भोजन दे तृप्त मी न तव नमनीं २४
" नरमांसभक्षणाची इच्छा अनिवार जाहली ! राया !
याचक होवुनि आलों तव सदनीं सिद्ध होइं वाराया २५
" जरि चोर जार, पापी, रोगी, चांडाल, पतित, कृश, वृद्ध
वा विकृत आणशी तरि घेइन नच मी तसाचि नरबद्ध २६
कर जोडुनि नृपदारा परम उदारा सती, नृपासहित !
विनवी " अस्मन्मांसें व्हावें जी ! तृप्त हें अम्हास हित" २७

अतिथि वदे " भक्षावे युष्मन्मांसास म्यां जरी क्षुधितें
" तरि अन्नसत्रहानी होइल मज निंदितील ~~सुमतिही~~ ते २८
" केव्हांही मजसाठीं सत्वाची लेश—मात्र हानि न हो
" यास्तव युष्मन्मांस क्षुत्पीडित तरिहि मी न सेविन हो २९
" परि सुकुमार तनय तव राजस; बत्तीस लक्षणी चिलया
" दे भोजनार्थ राया ! तेणें जाईल मत्क्षुधाचि लया ३०
दुस्तर तनय-प्रेमा दूर विवेकें करोनिया राजा
वदला विनयें " स्वामिन् ! जावा घेउनि अवश्य सुत माझा ३१
शिव बोले " मानिसि कां सिंह, वृक, व्याघ्र, रीस तरस मज
" कीं हिंस्र श्वापदसम भक्षावा सुत तुझा असा समज ३२
" स्वकरोंचि चांगुणेनें आणावें तनयमांस शिजवून
होईल सत्वहानी अत्स्वल्पहि यांत जरि पडे न्यून " ३३
ऐकुनि ती अतिथींची हृदयविदारक भयावहा वाणी
वदुनि अवश्य निघाली स्वसुता शोधावया त्वरें राणी ३४
येवुनि राजद्वारीं बाहे कळवळुनि ती निज कुमारा
" तूं गुंतलासि कोठें बाळा ! खेळावयासि सुकुमारा ३५
" ये धांवत झडकरि बा ! पाहे तव वाट चातकीसरिसी
" यतिवर हा खोळंबे तुजसाठीं मग उशीर कां करिसी " ३६
होता खेळत चिलया बालक निजसम वयस्क जमवून
तो तन्मातेची दे खेळांतुनि हांक चित्त उडवून ३७
दुडदुड धांवत आला बाळ जनन्यंचला धरुनि बोले
"मज बाहिलें कशाला माते ! तव नेत्र आज कां ओले" ३८

सं. नं.
ता.
ठाणें.
मराठी ग्रं...
नोंद नं. ५
ठाणें



सुतवचनें गहिंवरलें हृदय तिचें स्मरुनि भावि तद्विरहा
उचलुनि हृदयीं धरिला तनय दुरावेल कीं अतां चिर हा ३९
पारि सत्वरक्षणाला मायामोहासि दूर करुनि वदे
" आला एक अतिथि गृहिं यद्रूपें दर्शना गमे शिव दे ४०
" इच्छित वस्तु वराया प्रार्थियले चरणिं होउनी नत या
त्वन्मांसाचें भोजन मागे, याविण कशांत रुचि न तया " ४१
परिसुनि मातृ-मुखोद्गत वचन परम हर्षला कुमार-मणी
ज्या प्रसवुनि राज्ञीनें लाजविल्या सकळ सुतवती रमणी ४२
बाळ वदे " माते गे ! धन्य बहू दिवस आजिचा साचा
" यत्यागमन गमे मज परम अनुग्रह उमानिवासाचा ४३
" मनुज-तनु क्षणिक जगीं घडिहि जिचा भरंवसा नसे माते
सत्कार्यीं लागुनि ती होइल कृतकृत्य गमतसे माते " ४४
प्राशी राणी कर्णीं प्रेमें निजसुत मुखोद्गतामृत हें
शोक भयंकर वाढे की होइल बाळ झाणिं अतां मृत हें ४५
घडिघडि कुरवाळुनिया नव-पंकज-सुप्रसन्न वदनातें
सत्वार्थ सुत वधाया गेली घेवोनि पाकसदनातें ४६
घे चुंबन शेवटचें बसवुनि कष्टें वधावया पुढतीं
दोहिं करें दृढ धरुनी धैर्यानें शस्त्र उचललें वरतीं ४७
तोडावें शिर झाणिं जों दृष्टि पुन्हां सुतमुखीं विकळ वळली
फिरली तोंच वधेच्छा मातृप्रेमें मनांत कळवळली ४८

"नउ महिने या उदरीं जपलें प्राणाहुनीहि तुज नित्य
"ती मी वधार्थ सजलें माता नच वैरिणी तुझी सत्य ४९

घेऊनि जन्म बाळा! केला त्वां उभय-वंश धन्य जनीं
"त्वदुदारतेसि पाहुनि लाजावें कीं महावदान्यजनीं ५०

"ज्यांतुनि लडिवाळपणें "आई! आई!" सुशब्द हा! हा! ते
"निघती पळांत शतदां; चरचर चिरु काय कंठ हा हातें ५१

"सुतवधाचि काय भाळीं लिहिला होता असा विधात्यानें
"द्याव्या होत्या याहुनि शिक्षा नरकादि बहुविधा त्यानें" ५२

मोहावश मातेला पाहुनि बहु खिन्न होय बाळ मनीं
बोले नम्र वचातें कीं कर्तव्या चुको न निज जननी ५३

"या नश्वर देहास्तव निष्कारण करिसि शोक कां माते?
"हा सर्वस्वी बुडविल मोक्षातें धर्म–अर्थ-कामाते ५४

"या असमय-मोहानें होइल गे! सत्वहानि रायाची
"जायाची कीर्ति लया शंभु-पद-प्राप्ति अंतरायाची ५५

"माते! मानवलोकीं जन्मुनि नच कवण सांग मेला गे?
"मागें जीव-मृगांच्या मृत्यु सदा व्याघ्रसा गमे लागे ५६

"तूं आज न वधिसी जरि होइल तव तनय अमर हा काय?
"यास्तव निज हस्तानें लावी सत्कारणांत हा काय ५७

"गर्भाशयांत माते! असु मातें कष्ट सोसुनी फार
"दिधले; परत पुन्हा तें घ्याया, तुजलागिं पूर्ण अधिकार ५८

" हा उशिर पेटवील क्षुत्पावक साच अतिथिचा बहुत
" सत्वर शमवी त्यातें करुनी मन्मांस हवि तयांत हुत ५९
" शोक त्याजि मरणोत्तर घेइन मी याच उदरिं जन्मास
" अचिरेंचि लया नेइन तुमच्या अनपत्यता कलंकास ६०
" झाला बहु काल असो स्वीकारीं शेवटील मन्नमन
" शिर सोडवि तनुपासुनि शीघ्र अतां, ठेवुनि प्रसन्न मन" ६१
सुत-शब्द-सहस्त्रकिरण तन्माया-मोह निबड-तम नाशी
झाली सिद्ध वधाया भावे मनिं नमुनि मदन-कदनाशी ६२
एकाचि घावासरिसें उडवी तनुपासुनी कमलवदन
निजसुतघातेंहि तिला लाभे सत्कीर्तिचें अमल सदन ६३
" नच पुत्र आपणाला " यास्तव शिर ठेवि चिर पहायास
तीस गमे यद्दर्शन " सुकर करिल विरह-भर सहायास " ६४
मग काढुनि तनुमांस स्वकरें कारि पाक सिद्ध नृपभार्या
वाढुनि सुवर्णपात्रीं विनयें बोले "उठा" अतिथिवर्या ६५
" फार विलंब जहाला याची प्रभुजी! मला क्षमा ठेवा
" सेवुनि सुत-मांस अतां रक्षावा सत्वरूप हा ठेवा " ६६
श्रीशिव अंतर्द्रष्टा जगदात्मा विश्व-सूत्रधार विभू
इच्छामात्रें सृजितो सर्वेश्वर नभ, समीर, जल, पवि, भू ६७
अंतर्ज्ञानें बघतां कळलें शिर लपविलें असें जेव्हां
उठुनी क्रोधावेशें शीघ्र निघाला न बोलतां तेव्हां ६८
नृपवर कांतेसह झणि धांवुनि धरि पूज्य-अतिथि-पाय करीं
स्वकुल-क्षय-कारक तत् क्रोधानल शमविण्या उपाय करी ६९

" स्वकरें शिजवुनि अर्पी राज्ञी सुतमांस सुगुण सरिता ही
" कां मग कोप स्वामिन् भवदुक्त्यनुसार सर्व करितांही ७०
या नृपवचनें अधिकचि दावी निजक्षुब्धता उमावर ती
बोले " अपराध बळें करुनि खला! मागसी क्षमावरती ७१
" जी तव राणी मानी बहु साध्वी आपणास या जगतीं
" कां शिरविरहित नीरस अर्पी तनुमांस भोजना मग ती ७२
" सर्वहि गात्रांमाजी शिरकमळ श्रेष्ठ कळत अज्ञाही
" परि समजुनि उमजुनि रे! करितां माझी अशी अवज्ञाही ७३
" यापरि याचक वंचुनि वरि दाविसि सत्वशीलता मोठी
" ऐसें होते तरि कां आशा मज दाविसी अशी खोटी ७४
" हें कपट कां? अतां तरि सांग नृपा स्पष्ट शीघ्र मज 'नाहीं'
" कळविन लोकीं कीं तुज विश्वासावें न याचकजनाहीं" ७५
शिवकोपानल पेटवि जों नृप सत्वेंधनास भक्षाया
तों विनय-शद्ब-सुजलें शान्त, करी भूप त्यासि रक्षाया ७६
" भगवन्! दया करावी आह्मी आहोंत परम अपराधी
" सुतमोहें शिर ठेवी राज्ञी ही; याविणें न अपराधी ७७
" आतां असें न होइल वदतो घेवोनि शंभुपद शपथ
"मजवरि करा अनुग्रह नत-शासनिं धरिति हा कवीशपथ" ७८
गहिंवरला मनिं शंकर ऐकुनि हें परम करुण नृपवचन
परि अंगीकृत वेषें त्या स्त्रमुखें काढवे सकृप वच न ७९
लटक्या क्रोधें पुनरपि वदला मग कपट-वेष-धर-शिव तो
"केली सकृत्क्षमा तुज न तरि अदयता कलंक मज शिवतो ८०

" यापरि मज वंचाया पुनरपि जरि व्हाल मूढ हो सिद्ध
" आधीं सत्व हरुनिया शापशरें करिन हृदय मग विद्ध ८१
" आतां मदुक्तिसरसी करवी रे शीघ्र सिद्धता सांग
आणाया राणीतें तें शिर माझ्यापुढें नृपा ! सांग ८२
" घालुनि उखळीं स्वकरें कांडावे त्यास मजसमोर तिनें
" त्यासमयीं रमवावे मज; सुत-गुण-गान-युक्त भारतिनें ८३
" गुण गातां शिर कुटतां नयनीं जरि अश्रुबिंदु पाहीन
" हृदयास कष्ट होतां सत्व हरिन होउनी कृपाहीन " ८४
भूपाज्ञेनें राणी सत्वर घाली सुपुत्र शिर उखळीं
परि हृदयीं येउं न दे दुःखाची एकमात्रही उकळी ८५
सद्गुणगानें तनयाचें आठवुनी गीत गाय मंजुळ ती
किन्नर-यक्ष-सुरासुर मोदें ऐकावया नभीं मिळती ८६
" बाळा ! सुहास्यवदना ! कमलदलाक्षा सुलक्षणा ! चिलया
" त्यजुनि कसा मज जासी सुकुमारा ! नेवुनी दया विलया ८७
" मीन जसा उदकाविण तुजविण मम हृदय तेवि बहु कष्टी
" सृष्टि गमे शून्य; जशी अंधागति हेतु सांडिता यष्टी ८८
" पुत्रप्राप्त्यर्थ किती व्रत-नियमादि स्त्रिया करिति यत्न
" म्या दुष्ट पापिणीनें वधिलें परि एकमात्र सुतरत्न ८९
" सत्कार्यीं तनु अर्पुनि बाळा ! झालासि साधुमान्य जनीं
" उन्नतपद मेळविलें दुष्प्राप्यचि जें शमींदमीं यजनीं ९०
" तुजसम सुतरत्नाच्या झालें मी धन्य सर्वथा जननी
" करितिल मद्भाग्याचा वाटे हेवा वदान्य-जन-जननी, ९१

" क्षणभराहि विरह माझा सदनीं तव मृदुल हृदय नच सोशी
" मग गहन मोक्षमार्गीं मजवांचुनि एकटा कसा जाशी ९२
" सुत वधुनि केवि दावूं कृष्णवदन अदयहृदय या जगतीं
" प्राणत्यागावाचुनि अन्य दिसे मज न इष्ट आज गती ९३
" जातां सुतृप्त होउनि अतिथिगृहांतूनि; तुजसवें आधीं
" मी येतें थांब अतां न सहावें विरहरूप हा आधी ९४
" गेलासि कसा टाकुनि निजमाता; शंभुपदा नमायाला
" त्वद्विरहज्वलनातें न पुरे हें हृदय सदन मायाला ९५
" आचंद्रार्कांत तुझें विमल यशोगान सुकवि करितील
" निजकरुणार्द्ररवानें विश्वाचें देहभान हरितील ९६
" तव चरितामृत जैसें तैसें काम न सुरद्रु पुरवील
शमवील विषयतृष्णा लेशहि संसारताप नुरवील ९७
" अस्मत्--सत्व-- धनातें रक्षुनि जी दाविलीस सुतरीती
" अनुसरतां सर्व जनीं होइल संसार--सिंधु--सु--तरी ती ९८
" त्वां लाजविलें स्वयशें क्षीरोदधि—अमृतकर—हिमनगां हीं
" या मीच काय बहुदा देइल परि अतिथिचेहि मन गाहीं ९९
" अल्प वयांतचि साधिसि सुरदुर्लभपद करोनि सत्कृत्या
" ऐशा गुणवंताची माता शोभे न मी महाकृत्या १००
" त्रिभुवनाहि शोधितां बहु न मिळे कीं तुजसमान बालक रे
" दैव कसें त्या तनुचें करवी माझ्याचि हाय! हाल करें १०१
" मम हृच्चकोरचंद्रा बा! तूं नवनीत मृदुलगात्र परी
" पडतें वज्रासम हें या दुष्टेचें कठोर मुसळ शिरीं १०२

स्थळ प्रत १०८९
सं. क्रा ०५ नं.
ता.
नोंद नं. ६८
ग्रा. क्रं.


करुणस्वनें अशापरि सुतगुणमान आठवोनि गानकरी
तेव्हां हर्म्यस्थ सकळ रडले गो-महिष-तुरग-हरिण-करी १०३
पाषाणहि पाझरती करिती वृक्षादि जडहि आक्रांत
चित्रेंहि अश्रु गाळिति सचराचर विश्व बुडत शोकांत १०४
परि राणी येवुं न दे पाणी नयनांत तेधवां लवहीं
गहिंवरला करुणाकर पाहुनि ही सत्व-धीरता शिवही १०५
होतांचि सिद्ध कुटुनी आणी स्वकरें शिरास शिजवून
साष्टांग नमुनि उठवी अतिथिवरा भोजनास विनवून १०६
अतिथि वदे " अवनीशा ! यजमान तुह्मीहि उभयतां माते
द्या पंक्तिलाभ न तरी क्षुधितचि ऐसा त्यजीन धामातें १०७
ऐकूनि वचन कानीं संकोचित होय महिवरेश तदा
निज दैवदुर्विलासा स्मरुनी चित्तांत गहिंवरे शतदा १०८
सुत मोहें शंकित मन रायाचें पाहतां वदे भार्या
" आर्या ! या समयीं हा मोह विघातक बरा न सत्कार्या १०९
" अनुपम औदार्यें जें आजवरी रक्षिलें नृपा ! यशतें
" रक्षा रक्षावें जें प्राणाहुनिही बुधें उपाय शतें ११०
" शिवसम अतिथि-समागम घडला भाग्यें, घडे न नवसानीं
" व्हा सादर तद्वचना होवु न द्या सत्वघात अवसानीं १११
" मी नउ महिने ज्याचा नाथा ! उदरांत वाहिला भार
" दो चौ प्रहराकरितां होतो तो कां तुह्मास जड फार ११२
" निज तनुमांस समर्पुनि रक्षी जो सत्व पितर ताराया
" पोटींचा सुत पोटीं घालाया काय शंकिता राया ११३

" आजवरी तनयाचें प्रेमानें जेंवि पुरविलें कोड
" या मंगल प्रसंगीं आतां शेवट करा तसा गोड " ११४
यापरि सुशब्दवातें मोहनि-विडघन पळांत ती पळवी
कळवी हित रायाची अतिथिसवें भोजनार्थ मति वळवी ११५
स्त्रीवचनें रायाची होतां कर्तव्यजागृति प्रकट
बसला सदार येवुनि जेवाया शीघ्र अतिथिच्या निकट ११६
सुतमांसग्रास मुखीं घालावा तोंच दूर पात्रास
सारुनि, अतिथि अकस्मात् वदला द्याया बहू नृपा त्रास ११७
" वदनहि निपुत्रिकाचें न पहावें, सदनिं पद न ठेवावें
" घ्यावें न नाम वाचें मग त्याचें अन्न केविं सेवावें " ११८
वज्राघाताचि गमला पडतां वाणी सदुःसहा कानीं
नृपधृतिनग ढासळला भरलें गृह हाय! हाय! हाकांनीं ११९
शोकावेग सतीनें धरिला आवरुनि जो विवेकानें
तो हृत्कपाट भेदुनि पडला बाहेर फार वेगानें १२०
कंठीं गहिंवर दाटे लोटे नयनांत अश्रुचा पूर
निष्ठुर वच दग्ध करी हृदय तिचें, अग्नि जेवि कापूर १२१
सुतशोकदावतप्ता पवनजवोन्मूलिता जशी कदली
होवोनि दीन भूवरि पडली, आर्तस्वरें अशी वदली १२२
" सुकुमार, सद्गुणी, सुत होता जो एकमात्र सन्महित
" स्वकरें शिजवूनि तुह्मां दिधला साधावयास जन्महित १२३
" भगवन्! दया करावी दीनांचा अंत किति पहावा हो
" तुमच्या उपकृति-भारा मजसह चिरकाल भूप हा वाहो १२४

" श्रीशंकरा ! महेशा ! देवा ! करुणाकरा ! मदनदहना !
" भक्ता भयकर–वरदा ! श्रीगिरिजा वल्लभा ! वृषभवहना १२५
" नतजनभवभयहरणा ! शरणागत वत्सला ! प्रभो ! सदया !
" या समयीं दीनांची नाथा ! यावी न कां तुह्मास दया १२६
" अतिथि गृहाप्रति आला दिधलें प्रियतनय-मांस भोजन हो
" तत्कथित सर्व केलें कीं दुर्लभ तव सुपद-सरोज न हो १२७
" बसलों सर्वेचि अशना सुतशोकव्यथितहृदय आवरुनी
" कीं मोहास्तव केवळ न ढळावें सत्वसत्पथावरुनी १२८
" परि अस्मत्दुर्दैवें आवरिला हात घेइन ग्रास
" लागे अनपत्यत्वग्रहणाविमलवंशाविधुसखग्रास १२९
" आत्माचि पुत्र वदती त्याची सत्वार्थ न गणिली परवा
" सत्वपराङ्मुखतेहुनि नरकीं कल्पांत वासही बरवा १३०
" झालेंचि वंशखंडन आतां न दिसेल तनयवदन पुढें
" जाईल अतिथि विन्मुख देवा ! यश, कीर्ति, सत्व सर्व बुडे १३१
" सुत मारुनि या लोकीं हारवुनी सत्व तेविं परलोकीं
" नाहीं सगति कुठेंही, ऐसें झालोंच बा ! दयालो ! कीं " १३२
ती सुतशोकद वार्ता हरिणीसी धाय मोकली राणी
स्रवती अविरत तेव्हां प्रेमभरें अतिथिनयनही पाणी १३३
सुरवर सर्व विमानीं जमले नृप सत्वकौतुक पहाया
वदती " भावबळानें जिंकी अजिता शिवा क्षितिप हा या १३४
" नकळेंचि काय देइल यातें ईश प्रसन्न होऊन
" यत्सत्वधीरतेला वाटतसे मुक्तिपदहि हो ! ऊन " १३५

उग्र कपटवेषींही भगवान् शिव बघुनि भाव रायाचा
प्रेमभरें गहिंवरला जरि करि बहु यत्न आवरायाचा १३६
त्या यापुढें छळाया राहे हृदयीं न धीर देवाच्या
मग भक्तकामकल्पद्रुम गद्गद होउनी वदे वाचा १३७
“सति! धन्य धन्य गमतें तुमची भुवनत्रयांत सत्वरती
“एकचि पुरवी आतां इच्छा मम शेवटील सत्वर ती १३८
“मारी हांक सुतातें बैसाया भोजनास मजसहित
“जोडेल पूर्ण यश मग मद्वच होईल हें तुह्मास हित” १३९
झाली क्षणैक शंकित; ठेवुनि परि भाव तद्वचावरती
बाहे सुतासि राजद्वारीं; चिंतुनि मनीं उमावर ती १४०
“बाळा! गुण-गण-निलया! चिलया! विलयासि सत्व जावो न
“यास्तव नृपकुलकेतो! सुकुमारा! येइ शीघ्र धावोन १४१
“तुजविण अतिथि उपाशी जाइल; तुज दिसत काय बरगे गा?
“क्षणही हृदय अतां हें साहेना विरहदुःखभर-वेगा १४२
“म्या दुष्टेनें वधिलें तुज; यास्तव धरुनि काय राग मनीं
“मन्मानसाब्धिचंद्रा! करिसि असा उशिर आज आगमनीं १४३
“ये रक्षि सत्व सत्वर आतां किति बघसि अंत रायाचा
“न तरि अतिथिकोपानें शंकर-पद-लाभ अंतरायाचा १४४
“येशि न जरि तूं, जाइल आजवरी रक्षिलें सुयश वायां
“कोण समर्थ तुझ्याविण बाळा! आह्मां सुखांत बसवाया” १४५
अद्भुत घटना प्रभुची जों “बाळा! धांव” हांक दे सगुणा
तों रविमंडळसा सुत धांवुनि ये मातृशोकतमहरणा १४६

सुतमुखचंद्रसुदर्शन आणी जननीसुखाब्धिला भरती
आलिंगुनि सरभस त्या विसरे निजदेहभान पलभर ती १४७
प्रभुहि कपट वेषातें टाकुनि निजभक्त मंगल कराया
प्रकटे निजरूपें तों लोळवि तत्पदरजीं अलर्क राया १४८
निज हृदयस्थ प्रभुचे तें दशभुज, पंचवदन, अभयकर
बघतांच रूप, राणी जोडी होवोनि लीन उभयकर १४९
प्रेमें उचलुनि धरिला प्रभुनें चिलया दृढ स्वहृदयासी
वाटे जणु यायोगें दावी कीं "योग्य हेंचि पद यासी १५०
मंगलमय वर्णाया प्रभुभक्तप्रेमसुखसमागम तों
मी किति, सहस्रजिव्हहि येथें असमर्थ मन्मना गमतो १५१
वारंवार सुभक्तां कुरवाळी प्रभु हिमाद्रिजामाता
कीं भेटतां बहु दिसां प्रेमानें जेवि आत्मजा माता १५२
वदला "नृपा! उभयतां झाला जगिं धन्य सुयश साधूनीं
"आत्मत्यागा तुमच्या वाटे गावें सदैव साधूंनीं १५३
"दाते होतिल, झाले, असती रत जे सदा अतिथि भजनीं
"परि तुह्मांसम तुह्मी व्हाल यशोरूप अमरकाय जनीं" १५४
मात पुरांत कळे तों प्रेमें पुरजनहि धावले सर्व
कीं वायां नच जावें प्रभुदर्शनरूप हें महा पर्व १५५
ईशें दर्शन देवुनि केले पावन समस्त पौरजन
ते "शिव! हर! हर! गर्जुनि मोदभरें करिति शंभुचें भजन १५६
शेवटिं सदार भूपति विनवी पद नमुनि कृत्तिवासातें
"प्रभुनें चिरवांछित मम पुरवुनि केलेंचि धन्य दासातें १५७

" परि ज्या नयनीं तुमचें अविनाशी रूप पाहिलें नाथा!
" त्यानींच का पहावें नश्वर भवजन्यविषय हे आतां १५८
" यास्तव पुरें असो; मन विटलें संसारनरकवासातें
" स्वपदीं चिर ठेवावें, प्रभुजी द्या हेंच दीन दासातें" १५९
स्थापी साम्राज्यपदीं निजहस्तें शीघ्र रावतनयातें
अर्पी तदाच दुर्लभ विमल यशोरूप निज वतन यातें १६०
बसवुनि दिव्य विमानीं प्रभुनें मग चांगुणाश्रीयाळातें
नेलें सच्चित्सुखमय लोकीं, जेथें न वाव काळातें १६१
यापरि शिवभक्तिबळें साधी भूपाळ मुक्तिपदवीतें
कलिमलहरच्चरितप्रेमें प्रभु मम मुखेंचि वदवी तें

## उपसंहार (श्लोक)

लीला सर्वेश्वराची कलिमलहरणी वर्णितां सौख्यकारी
सारी संसारदुःखें भवभयजनित भ्रांति तैसी निवारी
अर्पी सप्रेमभावें ह्मणुनि शिवपदीं काशिनाथ प्रहृष्ट
पद्यें हीं बिल्वपत्रें मुखतरुगलितें एकशेंएकसष्ट

REFBK-0004489
REFBK-0004489

समाप्त

मुद्रकः—
नारायण नरसिंह फडणीस
बाबजी प्रिंटिंग प्रेस
जळगांव. पू. खा.

प्रकाशकः—
डॉ. का. रा. धर्माधिकारी
दर्यापूर (वऱ्हाड)